चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२१ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २१/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **रामनगर, बल्लारशहा, ब्रम्हपुरी, सिंदेवाही, नागभिड, धाबा, कोरपना** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१०** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०३** आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **५,३८,८००/—रू.** चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in



☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १) पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर :–

दिनांक **२१/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर** अंतर्गत मौजा जोडदेउळ जवळ ०१ आरोपी हा सट्टापट्टीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **चंद्रपुर शहर** येथे अप. क्र. **२०९/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **१०,८८०/–रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **चंद्रपुर शहर** पोलीस करीत आहे.

---

### १) पोलीस स्टेशन तळोधी :–

दिनांक **२१/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **तळोधी** अंतर्गत मौजा ओवाळा येथे ०१ आरोपी हा सट्टापट्टीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **तळोधी** येथे अप. क्र. **५१/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **१७५/–रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **तळोधी** पोलीस करीत आहे.

---

# पोलीस शिपाई भरती प्रक्रिया सुधारणा

पोलीस दलातील पोलीस शिपाई भरती प्रक्रिये दरम्यान नुकतेच महत्वाचे फेरबदल करण्यात आले आहे. दिनांक १८ जानेवारी २०१९ रोजी गृह विभागाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या आदेशाव्दारे पोलीस दलात सुधारणा करण्याकरीता नियम करण्यात आले असुन या नियमांना महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०१९ असे संबोधण्यात आले आहे.

पोलीस शिपाई सेवा प्रवेशा करीता प्रथम शंभर गुणाची शारिरीक चाचणी घेण्यात येत होती परंतु दि. १८ जानेवारी २०१८ च्या आदेशान्वये यापुढे पोलीस शिपाई सेवा प्रवेशा करीता उमेदवारांची प्रथम शंभर गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येणार असुन त्यानंतर पन्नास गुणांची शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. लेखी परिक्षा ही अंकगणित, सामान्य ज्ञान व चालु घडामोडी, बुध्दीमत्ता चाचणी, मराठी व्याकरणावर आधारित असेल तर शारिरीक चाचणीमध्ये पुरूषांकरीता १६०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे व गोळा फेक व महिलांकरीता ८०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे व गोळा फेकचा समावेश असेल.

सदचा आदेश हा महाराष्ट्र पोलीस दल यांचे संकेत स्थळ www.mahapolice.gov.in तसेच चंद्रपुर जिल्हा पोलीस दल यांचे संकेत स्थळ www.chandrapurpolice.gov.in यावर उमेदवारांकरीता प्रसिध्द करण्यात आले आहे.

———————————————————————————————————